**सन २०१०-११ करिता राज्यातील नवीन अशासकीय औ.प्र.केंद्र व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औ.प्र.केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांना परवानगी देण्यांबाबत.**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आयटीआय-२०१०/३६/प्र.क्र.२४/व्यशि-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०१.
दिनांक : ११ मे २०१०

संदर्भ :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. आयटीआय-१०९९(८८)/ व्यशि-१, दि.१९ मे,२०००.
२) संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांचे पत्र क्र.१२/एएफएन/२०१०/(१२)/१६०, दि.२७/०१/२०१०

**प्रस्तावना :-** सन २०१०-११ करिता राज्यामध्ये नवीन अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यांस व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्यांसाठी संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी वर्तमान पत्रात जाहिरात दिली होती या अनुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याकरिता शासनाच्या उच्च स्तरीय समितीची दि.२२ फेब्रुवारी,२०१० रोजी बैठक आयोजित करण्यांत आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशीनुसार कायम विना अनुदान तत्त्वावर नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यांस व विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्याच्या प्रस्तावांना परवानगी देण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर आता सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाकरिता कायम विना अनुदान तत्त्वावर सोबतच्या प्रपत्र -"अ" (१२६ नवीन केंद्रे), प्रपत्र-"ब"(८८ केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या) व प्रपत्र - "क" (०१ विद्यमान औ.प्र. केंद्रांमध्ये व्यवसाय बदल करणे) मध्ये दर्शविल्यानुसार नवीन अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्यांस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यांत येत आहे.

**१) अटी व शर्ती :-**

**अ) नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांसाठी :- प्रपत्र - "अ "**

१) सदर नवीन केंद्रांना (प्रपत्र-"अ" प्रमाणे) मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने केंद्र शासनाच्या ट्रेनिंग मॅन्युअलमधील मानकानुसार आवश्यक त्या बाबींची १०० टक्के पूर्तता करुन स्थायी समितीमार्फत आगामी होणारे निरीक्षण करुन घेऊन सदर व्यवसायांना डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन घ्यावी लागेल. तसेच डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांचेकडून संलग्नता प्राप्त झाल्याशिवाय प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येऊ नयेत.

२) शासन निर्णय क्र. पीटीआय-१०००/२४६/व्यशि-२, दि. १५ एप्रिल,२००२ नुसार संस्थेने प्रत्यक्षात प्रवेश देण्यापूर्वी रु.१,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) एवढी अनामत रक्कम संचालकाच्या पी.एल.ए. खात्यात जमा करण्यांत यावी.

२/

३) डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांच्या सूचनेप्रमाणे संलग्नता प्राप्त नसतांना विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत. असे प्रवेश दिल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येणार नाही. याची जबाबदारी संस्थेची राहील, याची संस्थेने नोंद घ्यावी.

४) या व्यतिरिक्त नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयाचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

५). डि.जी.ई. टी., नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे / निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश, संलग्नता, परीक्षा इत्यादी बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता केल्यास संस्थेस दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

६) त्याचप्रमाणे डि.जी.ई.टी., नवी दिल्ली व संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

**ब) सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमधून नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु / व्यवसाय बदल इ. सुरु करण्याबाबत. - प्रपत्र -" ब "**

१) मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने आवश्यक त्या बाबींचे केंद्र शासनाच्या ट्रेनिंग मॅन्युअल मधील मानकानुसार १०० टक्के पूर्तता करुन स्थायी समितीतर्फे आगामी होणारे निरीक्षण करुन घेऊन सदर मंजूर नवीन व्यवसाय/जादा तुकडीस डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन घ्यावी लागेल.

२) सदर नवीन व्यवसाय जादा तुकड्यांना डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांची संलग्नता घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत अन्यथा प्रवेश दिल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येणार नाही. याची जबाबदारी संस्थेची राहील, याची संस्थेने नोंद घ्यावी.

३) शासन निर्णय क्र.पीटीआय-१०००/२४६/व्यशि-२, दि. १५ एप्रिल,२००२ नुसार संस्थेने प्रत्यक्षात प्रवेश देण्यापूर्वी रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) प्रति व्यवसाय, प्रति तुकडी एवढी अनामत रक्कम संचालकांच्या पी.एल.ए. खात्यात जमा करण्यांत यावी.

४) या व्यतिरिक्त शासनाकडून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयांचे / आदेशांचे काटेकारपणे पालन करण्यांत यावेत.

५) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालकांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांने/निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश, संलग्नता, परीक्षा इत्यादी बाबतीत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता केल्यास संस्थेस दिलेल्या नवीन व्यवसायांची / जादा तुकड्यांची परवानगी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

६) तसेच डि.जी.ई.टी., नवी दिल्ली व संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई-१ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३/-

२) सदर शासन निर्णयान्वये मान्यता दिल्याप्रमाणे नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या विहित रित्या प्रत्यक्षात सुरु करण्यांत आल्या आहेत किंवा नाही याबाबतचा अहवाल संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-१ यांनी सप्टेंबर,२०१० च्या पहिल्या आठवड्यापर्यंत शासनास सादर करावा.

३) उपरोक्त प्रमाणे सुरु होणाऱ्या नवीन अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांना व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय/ जादा तुकड्यांकरिता शासन निर्णय क्र. आयटीआय-२००८/रिट/(२७/०८) व्यशि-२, दि. ३१ मार्च, २००८ नुसार सुधारित प्रशिक्षण शुल्क लागू राहील.

४) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संगणक संकेतांक 20100511200206001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( सीमा ढमढेरे )
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-१.
२) संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-१.
३) सहसंचालक / उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालये, मुंबई / पुणे / नागपूर / नाशिक / औरंगाबाद व अमरावती.
४) मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, मंत्रालय यांचे खाजगी सचिव,
५) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण , मंत्रालय यांचे खाजगी सचिव,
६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई-१
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर-२
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९) सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी व यांचे कार्यालय.
१०) सर्व संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय.
११) संबंधित औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे यांना संचालक(प्रशिक्षण) यांचे मार्फत पत्र.
१२) निवड नस्ती / व्यशि-२.

शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक :- आयटीआय-२०१०/(२४/१०) व्यशि-३, दि.११ मे २०१०

प्रपत्र "ब"

## कायम विना अनुदानीत विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकडी / व्यवसाय बदल इत्यादी सुरु करणेबाबत मान्यता देण्यांत आलेल्या केंद्रांची यादी.

| अ.क्र | विभागाचे नांव | औ.प्र.केंद्राचे नाव | संस्थेस मान्यता दिलेल्या व्यवसाय / तुकडया | |
|---|---|---|---|---|
| | | | व्यवसाय | तुकडी |
| १ | | २ | ८ | ९ |
| | मुंबई विभाग | | | |
| १ | | मातृमंदीर देवरुख यांचे औ.प्र.केंद्र, साडवली, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी | यांत्रिक मोटारगाडी | २ री तु. |
| | | | तारतंत्री | २ री तु. |
| २ | | श्री गौतम कुमार वाडिलाल गांधी गुरुकुल औ.प्र.केंद्र, घाटकोपर, पुर्व, मुंबई ७७. | आरेखक स्थापत्य | १ ली तु. |
| ३ | | श्री मानव सेवा संघ संचलित श्रीमती सावित्रीबेन व श्री नेनुमल पारदासानी औ.प्र.केंद्र, सायन रोड, मुंबई २२. | इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | २ री तु. |
| | | | आरेखक स्थापत्य | १ ली तु. |
| ४ | | अहमद अब्दुल्ला गरीब इंड.ट्रेनिंग सेंटर, वफा पार्कच्या मार्ग, कौसा, मुंब्रा,जिल्हा-ठाणे-४०० ६१२ | यांत्रिक मोटारगाडी | १ ली तु. |
| | | | आरेखक यांत्रिकी | १ ली तु. |
| ५ | | साई अनिरुध्द एज्युकेशन सोसायटीचे डी.जे.सामंत औ.प्र.केंद्र, पाली, मु. पो. पाली, ता. जि. रत्नागिरी | संधाता | १ ली तु |
| | पुणे विभाग | | | |
| ६ | | ज्ञानकला क्रिडा व कृषी प्रतिष्ठान संचलित औ.प्र.केंद्र, वालचंदनगर ता.इंदापूर, जिल्हा-पुणे | जोडारी | १ ली तु. |
| | | | संधाता | १ ली तु. |
| | | | आरेखक यांत्रिकी | १ ली तु. |
| ७ | | श्री छत्रपती औ.प्र.केंद्र भवानी नगर, इंदापूर, जिल्हा-पुणे ४१३ १०४. | रंगारी जनरल | २ री तु. |
| | | | विजतंत्री | १ ली तु. |
| ८ | | जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे औ.प्र.केंद्र, सराटी, ता. इंदापूर, जि. पुणे | विजतंत्री | १ ली तु. |
| | | | आरेखक यांत्रिकी | १ ली तु. |
| | | | संधाता | २ री तु. |
| | | | जोडारी | २ री तु. |
| ९ | | सोनाई प्रतिष्ठानचे औ.प्र.केंद्र, गोखळी, ता. इंदापूर, जि. पुणे | यांत्रिक डिझेल | १ ली तु. |
| १० | | बारामती इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी औ.प्र.केंद्र ,इ-१८२, एम आय डी सी, ता.बारामती जिल्हा-पुणे- | संधाता | १ ली व २ री तु. |
| | | | जोडारी | २ री तु. |
| | | | विजतंत्री | २ री तु. |
| ११ | | शिवनेरी औ.प्र.केंद्र, खानापूर, ता. जुन्नर, ज. पुणे | जोडारी | २ री तु. |
| | | | विजतंत्री | २ री तु. |
| १२ | | ज्ञानदिप ग्रामविकास प्रतिष्ठान औ.प्र.केंद्र,तळेगांव-ढमढरे, ता.शिरुर, जिल्हा-पुणे | विजतंत्री | २ री तु. |
| | | | तारतंत्री | २ री तु. |
| | | | हेअर ॲण्ड स्किन केअर | १ ली तु. |
| १३ | | श्री विघ्नहर ट्रस्टचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, निवृत्तीनगर (घालेवाडी), पो.शिरोली, बु. ता.जुन्नर,जिल्हा-पुणे | विजतंत्री | ४ थी तु. |

STATE: Maharashtra DATED: 30/7/2010

| | *SCIR (Standing Committee Inspection Report); DIR (Departmental Inspection Report); Std. Comm (Standing Committee); UC (Under Consideration); NR (Not Recommended); NC (Not Considered); SIR (Supplementary Inspection Report); PS (Power Supply); T&E (Tools & Equipment)* | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Name, Address & File No. of Institute for ref. & Future correspondence draft** | | **Trade** | **Units for which affiliation sought / recommended by** | | | **Approval by Sub-Committee of NCVT** | **Remarks** |
| | | | **Instt.** | **Std. Comm.** | **DGET** | | |
| 86. | Govt. ITI, Lakhandur Dist. Bhandara Pin- 441803 Maharashtra<br>DGET6/13/61/99-TC | Fitter<br>MMV<br>Electronics Mechanic<br>COPA<br>Mason | Addl. One Unit<br>Addl. One Unit<br>Addl. One Unit<br>One Unit<br>One Unit | Addl. One Unit<br>Addl. One Unit<br>Addl. One Unit<br>One Unit<br>One Unit | Addl. One Unit Total 2(1+1)<br>Addl. One Unit Total 2(1+1)<br>Addl. One Unit Total 2(1+1)<br>One Unit<br>One Unit | Addl. One Unit Total 2(1+1)<br>Addl. One Unit Total 2(1+1)<br>Addl. One Unit Total 2(1+1)<br>One Unit<br>One Unit | SCIR-12/5/2010 w.e.f. Aug 2010 |
| 87. | Govt. ITI, Mahableshwar Dist. Satara Maharashtra<br>DGET-6/13/58/98-TC | MMV<br>COPA | 2(1+1)<br>2(1+1) | 2(1+1)<br>2(1+1) | 2(1+1)<br>2(1+1) | 2(1+1)<br>2(1+1) | SCIR-1/5/2010 w.e.f. Aug 2010 |
| 88. | Saswad Mali Education Society's ITC, Malinagar, Tal-Malshiras, Distt-Solapur Maharashtra DGET-6/13/3/07-TC | Mech. Diesel | One Unit | One Unit | One Unit | One Unit | SCIR-7/5/2010 w.e.f. Aug 2010 |
| 89. | Govt. ITI, Bhor, Dist. Pune Pin-402206 Maharashtra<br>DGET-6/11/14/86-TC | COPA<br>Wireman | 2(1+1)<br>Addl. One Unit | 2(1+1)<br>Addl. One Unit | 2(1+1)<br>Addl. One Unit Total 2(1+1) | 2(1+1)<br>Addl. One Unit Total 2(1+1) | SCIR-4/5/2010 SIR-3/7/2010 w.e.f. Aug 2010 *This clears case kept pending in the meeting held on 15.6.2010. |
| 90. | Maturmandir Devrukh's Smt. Indira M.Behare, ITC,Sadavali, Tal. Sangameshwar, Dist- Ratnagiri Pin-415804 Maharashtra DGET-6/11/30/87-TC | Wireman<br>MMV | Addl. One Unit<br>Addl. One Unit | -<br>- | Addl. One Unit Total 2(1+1)<br>Addl. One Unit Total 2(1+1) | Addl. One Unit Total 2(1+1)<br>Addl. One Unit Total 2(1+1) | DIR-29/5/2010 w.e.f. Aug 2010 |